# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता. १२/०८/२०२०

## हिंजवडी येथिल मोबाईल शॉपी फोडल्याचे प्रकरण

## गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन गुन्हा उघड व गुन्हयातील मुख्य आरोपींना अटक, एकुण ५,११,६००/- रु किं चा मुद्देमाल जप्त

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, हिंजवडी पोलीस ठाणे हद्दित दि. २६/०८/२०२० रोजी रात्रीच्या दरम्यान राज मोबाईल शॉपी या दुकानाचे अज्ञात चोरट्यांनी शटर उचकटुन त्यातील विविध कंपनीचे मोबाईल फोन चोरुन नेल्याने हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-४६०/२०२० भा.दं.वि. कलम ४५७,३८०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचे प्रकरण गंभीर स्वरुपाचे असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, यांनी गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांना सदर गुन्हयाचा समांतर तपास करुन गुन्हा उघड करण्याचे आदेश दिले होते.

सदर प्रकरणाचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे, गुन्हे शाखा युनिट-४ , पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शना खाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व स्टाफने समांतर तपास सुरू केल्यावर परिसरातील १०० पेक्षा जास्त सी.सी.टि.व्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासल्या नंतर सदर प्रकरणात ५-६ आरोपी असल्याचे व सदर आरोपींनी गुन्हा करते वेळी पांढऱ्या रंगाच्या इको गाडीचा वापर केल्याचे आढळुन आले. परंतु रात्रीची वेळ असल्याने कोणत्याही ठिकाणी आरोपीची अथवा गाडीची ओळख पटेल असे फुटेज मिळुन आले नाही. तेव्हा सदर गुन्हयाच्या अनुशंगाने सखोल तांत्रिक तपास केला असता सदरचा गुन्हा भिवंडी, ठाणे येथिल सराईत गुन्हेगार **गुड्डू जलेबी** याने त्याच्या साथीदारासह केला असल्याचे निष्पन्न झाले. दि. १२/०९/२०२० रोजी पहाटे सदर आरोपीचा शोध घेणे कामी एक पथक भिवंडी येथे जाण्याच्या तयारीत असताना त्या आधीच माहिती प्राप्त झाली की सदरचा आरोपी हा त्याचे साथीदारासह वारजे परिसरात असुन तो भिवंडीला जाण्याच्या तयारीत आहे. तेव्हा गुन्हे शाखा युनिट-४, चे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुणे-मुंबई जाणाऱ्या हायवे वर सापळा रचुन पुणावळे परिसरात हॉटेल तंदुरी नाईट समोर आरोपी नामे **१) रमजान अली उर्फ गुड्डू जलेबी इशा मोहमद अन्सारी वय.२७ वर्षे,रा.इमाम चौक,रुम नंबर १०४५,अजमेरानगर भिंवडी,जि.ठाणे २) पाकी मन्सुर शेख वय.३५ वर्षे रा. अकबर खान याचे स्क्रॅपचे दुकान,विप्रो सर्कल जवळ,फेज २,हिंजवडी पुणे.** यांना पाठलाग करुन गुन्हयात वापरलेल्या मारुती सुझुकी कंपनीच्या इको गाडी नंबर- एम एच ०४ जी यु ८७१० सह पकडले. सदर गाडीच्या डिक्कीत गुन्हयात चोरीस गेलेले विविध कंपन्यांचे २३ मोबाईल फोन मिळुन आले.

सदर आरोपींकडे केलेल्या तपासात त्यांनी सदरचा गुन्हा हा त्यांचे साथीदार नामे १) जटवा ऊर्फ बाबा जुनई खान, २) हजरत अली खान, ३) इमरान अली, तिन्ही रा. वारजे मुळ राहणार उत्तर प्रदेश व ४) कामरान अन्सारी ऊर्फ मोनु, रा. भिवंडी यांच्या सह केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक आरोपीकडुन ०४,००,०००/- रु. किं ची इको गाडी व ०१,११,६००/- रु. किं चे मोबाईल फोन

जप्त केले असुन इतर आरोपींचा शोध सुरु आहे. अटक आरोपींना पुढील तपास कामी हिंजवडी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

यातील अटक आरोपी नामे **रमजान अली उर्फ गुड्डू जलेबी इशा मोहमद अन्सारी** हा कुख्यात गुन्हेगार असुन त्याचे विरुद्ध घरफोडीचे ०३ व जबरी चोरीचे ०२ गुन्हे दाखल आहेत

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.

